महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक:घभाव-१००४/प्र.क्र.२८/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक:- २१ सप्टेंबर २००६.

पहा: शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घभाव-२०००/प्र.क्र.९७/२०००/सेवा-५, दिनांक १७ फेब्रुवारी, २००१

शासन निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ मधील तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी सुधारण्यात आल्यानंतर, वरील दिनांक १७ फेब्रुवारी, २००१ च्या आदेशान्वये शासकीय निवासस्थानांसाठी आकारावयाच्या अनुज्ञप्ति शुल्काच्या दरांतही सुधारणा करण्यात आली आहे. या आदेशात नमूद केलेल्या वेतनमर्यादांमध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधिन होता.

२. शासनाने या वेतनमर्यादांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार, शासकीय निवासस्थानाचे वाटप करताना निवासस्थानाच्या प्रकारांची/चटईक्षेत्राची अनुज्ञेयता दर्शविणारा तक्ता सुधारुन खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:—

तक्ता

अ.क्र.	वेतनमर्यादा (रुपये)	अनुज्ञेय निवासस्थानाचा प्रकार	अनुज्ञेय चटईक्षेत्र (चौ.फूट)	अनुज्ञप्ति शुल्काचा ठराविक दर (रु.दरमहा)
१	२	३	४	५
१	२५५० ते ४०००	एक	२२० पर्यंत	६०
२	४००१ ते ६५००	दोन	२२१- ३२०	१३०
३	६५०१ ते ८०००	तीन	३२१-४२०	२२०
४	८००१ ते ९७००	चार	४२१-५५०	२९०
५	९७०१ ते १४३००	पाच	५५१-७५०	४६०
६	१४३०० व त्याहून अधिक	सहा	७५१-१११०	७००
७		सात (विशेष प्रकार)	१११९ व त्याहून अधिक	७००

हे आदेश दिनांक **१ ऑक्टोबर,२००६** पासून अंमलात येतील. या दिनांकास आणि त्या नंतर रिक्त होऊन वाटपासाठी उपलब्ध झालेल्या निवासस्थानाचे वाटप करताना वरील सुधारणा विचारात घ्याव्यात. संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनारुप निवासस्थानाच्या पात्रतेचा विचार न करता प्रत्यक्षात ताब्यात असलेल्या निवासस्थानाच्या प्रकारासाठी विहित केलेले अनुज्ञप्ति शुल्क वसूल करण्याविषयीची तरतूद यापूढेही अंमलात राहील.

३. भाडेमाफ निवासस्थानाच्या ऐवजी अनुज्ञेय होणारा घरभाडेभत्ता हा, सर्वसाधारणपणे देय होऊ शकणारा घरभाडेभत्ता आणि वेतनाच्या आधारे ज्या प्रकारचे निवासस्थान मिळण्यास संबंधित कर्मचारी पात्र असेल त्या

प्रकारच्या निवासस्थानासाठी आकारण्यात येणारे अनुज्ञप्ति शुल्क यांच्या बेरजेइतका मंजूर करण्यात येतो. हे आदेश दिनांक १ ऑक्टोबर २००६ पासून अंमलात यावयाचे असल्याने, त्या दिनांकापासून या आदेशातील वेतनमर्यादेसमोरील अनुज्ञप्ति शुल्क लक्षात घेऊन भाडे माफ निवासस्थानाऐवजीचा घरभाडेभत्ता मंजूर करण्यात यावा.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *(www.maharashtra.gov.in)* वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०९२११४८२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नसीमा म. शेख)
शासनाच्या उपसचिव.

प्रति,

- महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
- महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
- महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
- महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
- निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
- राज्यपालांचे सचिव
- मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
- उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
- सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
- मंत्रालयीन सर्व विभाग,
- सर्व विभागीय आयुक्त,
- मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
- *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
- *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
- *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
- *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
- *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
- सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
- संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
- मुख्य लेखा वरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
- उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
- जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
- सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
- सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
- वित्त विभागातील सर्व कार्यासने,
- निवडनस्ती, वित्त विभाग/सेवा-५

---

* पत्राद्वारे